जनसंपर्क कक्ष
18 APR 2021
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
तरुण भारत

# मंगळ ग्रहण पाहण्याचा खगोलप्रेमींनी घेतला आनंद

## टेलिस्कोप दुर्बिणीच्या माध्यमातून ग्रहण पाहण्याचा घेतला अनुभव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शनिवारी चंद्राच्या कोरीने लाल मंगळ ग्रहाला ग्रहण लावले. पृथ्वी आणि मंगळ ग्रहाच्यामध्ये चंद्र आल्याने मंगळ ग्रह दृष्टीआड गेला. म्हणजेच मंगळाला ग्रहण लागले. सायंकाळी ५.३० ते रात्री ७.३० दरम्यान मंगळ ग्रहन लागले होते. मंगळाचे ग्रहण भारताच्या बऱ्याच भुभागात दिसले. पुर्वेकडून विभागून जास्त वेळ हे ग्रहण होते. दुर्बिनीच्या माध्यमातून ग्रहण पाहण्याची पर्वणी खगोलप्रेमींनी मिळाली.

मंगळ ग्रहाने साडेपाचच्या सुमारास चंद्राला ग्रासण्यास सुरुवात केली. रात्री ७ नंतर या ग्रहातून मंगळ बाहेर पडायला सुरुवात झाली. चंद्रकोरीच्या खालच्या बाजूने मंगळ बाहेर



कोल्हापूर : मंगळ ग्रहाच्यामध्ये चंद्र आल्याने मंगळ ग्रहणावेळची चंद्रकोर.

येताना दिसून आला. परंतु ग्रहण लागण्याच्या वेळेला दिवस होता आणि सात वाजल्यानंतरही संधीप्रकाश असल्याने आणि चंद्राच्या प्रकाशामुळे कोल्हापुरातून अनेकांना ही घटना पाहता आली नाही. बऱ्याच खगोलप्रेमींनी टेलिस्कोप दुर्बिनीच्या माध्यमातून ग्रहण पाहण्याचा आनंद घेतला, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

### कोरोनामुळे ग्रहण पाहण्याची कोल्हापूरकरांची संधी हुकली

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यापीठाने मंगळ ग्रहण पाहण्यासाठी दुर्बिनीची सोय केली नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांची दुर्बिणीने ग्रहण पाहण्याची संधी हुकली. बऱ्याच खगोलप्रेमींकडून नाराजीही व्यक्त करण्यात आली.